## पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई (खुद्द)

**सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची विवक्षित कामकाजासाठी करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत**

**विभागाची आवश्यकता:**

पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई (खुद) कार्यालयातील पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई ( मुख्य कार्यालय ) येथील सुधारित अधिनियम तयार करणे, पुरातन स्मारकाच्या मार्ग दर्शीका तयार करणे, राज्यातील जलदुर्गावर व्यापक माहिती पुस्तीका तयार करणे व तत्सम कामकाज करण्यासाठी राज्य शासनाच्या पुरातत्वीय क्षेत्रातील सहायक संचालक/उप संचालक संवर्गातील सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांमधून, १ वर्षाच्या कालावधीकरीता, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई **(खुद)** या विभागात करार पध्दतीने भरावयाचे आहे. यास्तव राज्य शासनाच्या सेवेतील पुरातत्वीय कामाचा अनुभव असलेल्या, सहायक संचालक/उपसंचालक व तत्सम गट-अ किंवा गट-ब संवर्गातील सेवानिवृत्त झालेल्या अधिका-यांची नामिकासूची तयार करावयाची आहे व त्यामध्ये समाविष्ट सेवा निवृत्त अधिका-यांचा प्रथम १ पद वर्षाच्या कालावधीकरीता, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई (खुद्द) या विभागात करार पध्दतीने नियुक्ती द्यावची आहे.

**अटी व शर्ती :-**

१) सदर नियुक्ती प्रथम केवळ एक वर्षाच्या कालावधीकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक: सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि.१०/०६/२०२५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

२) उमेदवार पुरातत्वीय क्षेत्रात किमान ५ वर्षाचा अनुभव असलेल्या व शासकीय विभागातील सहाय्यक संचालक/उप संचालक वा समकक्ष संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिका-यांकडून सेवानिवृत्त झालेला असावा.

३) राज्य संरक्षित स्मारकांवरील जतन व संवर्धनाची कामे पुरातत्वीय दृष्टीने होण्यासाठी संचालनालयाची सुधारित अधिनियम कार्यनियम पुस्तिका तयार करणे व राज्यातील जलदुर्गावर माहिती पुस्तीका तयार करणे, व तत्सम कामे करणे आवश्यक असल्याने या संबंधीत क्षेत्रात किमान ५ वर्षाचा अनुभव असावा.

४) उमेउमेदवार राज्य शासनाच्या सेवेतून सहाय्यक संचालक/उप संचालक व तत्सम गट-अ किंवा गट-ब या संवर्गातील पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा.

५) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

६) उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

७) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.

८) आवश्यक अर्हता धारणा करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

९) उमेदवाराने सदर पदाकरिता अर्ज करण्याची मुदत दिनांक २४/०९/२०२५ सायंकाळी ५.३० पर्यत "संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, फोर्ट जॉर्ज, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जवळ, मुंबई ४०० ००१" या पत्त्यावर पोहोचेल, अशा रितीने पोस्टाने पाठवावा अथवा व्यक्तीशः आणून द्यावा. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२६२३३८० या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यव्हाराची दखल घेण्यात येणार नाही.

१०) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जाना उत्तर देण्यात येणार नाही.

११) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

१२) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांस पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई येथे काम करावे लागेल.

१३) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक: सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि.१०/०६/२०२५ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

---::-----::------

अर्जाचा नमुना

सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचरी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज

१) अर्जदाराचे संपुर्ण नाव :-

२) अर्जदाराचा पत्ता :-

३) सेवानिवृत्तीच्य वेळचे पदनाम :-

४) सेवनिवृत्तीच्या वेळचे कार्यालय :-

५) भ्रमणध्वनी क्रमांक :-

६) जन्म दिनांक/वय :-

७) विभागास अवाश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय

८) अनुभव :-

९) विशेष उल्लेखनीय काम :- ---

पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई ( मुख्य कार्यालय ) येथील सुधारित अधिनियम तयार करणे, पुरातन स्मारकाच्या मार्ग दर्शीका तयार करणे राज्यातील जलदुर्गावर व्यापक माहिती पुस्तीका तयार करणे व तत्सम कामकाज करण्यासाठी सदर कामकाजाचा अनुभव असलेला राज्य शासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिका-यांची (वे.श्रे.एस-२३ च्या मर्यादित) करार पध्दतीने नियुक्ती करण्यासाठी ३ वर्षाच्या कालावधीकरिता नामिका सुची(Penal) या कार्यालयाकडून तयार करण्यात येत आहे. यास्तव सदर कामाचा राज्य शासकीय कार्यालयात उप संचालक व तत्सम गट-अ या पदाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असलेल्या अधिका-यांमधून नियुक्ती देण्यात आलेल्या अधिका-यांस विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहेत.

एक वर्षाच्या कालावधीसाठी करार पध्दतीने सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबतची जाहिरात /सुचना मी काळजीपुर्वक वाचली असून, सदर जाहिरातीती/सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-मुंबई

दिनांक :-

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी